# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ Email :ropune.dte@gmail.com


जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/समावेशन/२०१९/3259 दिनांक : 06 AUG 2019

**परिपत्रक :**

विषय : **शासकीय कर्मचा-याच्या विनंतीनुसार संवर्गाअंतर्गत एका नियुक्ती प्राधिका-याच्या आस्थापनेवरुन दुस-या नियुक्ती प्राधिका-याच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समावेशन करण्याबाबतचे धोरण.**

*संदर्भ : महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१६/ प्र.क्र.५०९/कार्या.१२, दिनांक १५ मे, २०१९.*

*विनंतीवरुन / संवर्गबाह्य बदलीबाबतचे धोरण निश्चित केल्याबाबतचा दिनांक ०३ जून, २०११ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आला असून शासकीय कर्मचा-याच्या विनंतीनुसार संवर्गाअंतर्गत एका नियुक्ती प्राधिका-याच्या आस्थापनेवरुन दुस-या नियुक्ती प्राधिका-याच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समावेशन करण्याबाबतचे धोरण संदर्भित शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या* https://www.maharashtra.gov.in/1145/Government-Resolutions *या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा २०१९०५१५१२२७२८२४०७ असा आहे.*

*निम्नस्वाक्षरीकारांच्या असे निदर्शनास आले आहे की, शासनाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेले कर्मचा-यांशी संबंधित शासन निर्णय संस्थेतील / कार्यालयातील कर्मचा-यांच्या निदर्शनास आणले जात नसल्याने, कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी संबंधित कर्मचा-यांना अवगत होत नाहीत व अपूरी अथवा अर्धवट माहितीच्या आधारे संबंधित कर्मचारी या कार्यालयाकडे / संबंधित कार्यालयाकडे अर्ज करतात.*

*त्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था / कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर शासन निर्णय संबंधित संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेऊन तो संस्थेतील / कार्यालयातील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून, ज्या कर्मचाऱ्यांना बदलीसाठी अर्ज करावयाचा आहे, अशा कर्मचा-यांचे अर्ज सदर शासन निर्णयातील तरतूदी व सूचना विचारात घेऊन संस्था स्तरावरच अर्जाची पडताळणी करुन अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह व आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह या कार्यालयास सादर करावेत. तसेच संस्थेतील / कार्यालयातील आस्थापना विभागाने शासनाचे संकेतस्थळ रोजच्या रोज पाहून शासनाच्या संकेतस्थळावरुन शासन निर्णय उपलब्ध करुन घेऊन संस्थेतील / कार्यालयातील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावेत.*

*प्र. सहसंचालक,*
*तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.*

*प्रत : या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था प्रमुखांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता रवाना.*

*(२) ह्या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.*

*C:\my documents\Misc.doc\75*